# स्वमग्नता

स्वमग्नतेचा आजार ही एक वैयक्तिक आणि सामाजिक समस्या आहे. हा आजार जन्मतःच उद्भवतो. मेंदूमध्ये-मेंदूच्या विकास प्रक्रियेमध्ये काही अव्यवस्था होऊन, किंवा काही बिघाड होऊन हा आजार उद्भवतो.

दर हजार लोकसंख्येत साधारणपणे १ ते २ व्यक्तींमध्ये हा आजार आढळतो. लाखात १०० ते २०० व्यक्तींमध्ये तर कोटीत १,००० ते २,००० व्यक्तींमध्ये हा आजार आढळतो. महाराष्ट्रात सुमारे १० कोटी लोकसंख्येमध्ये १ ते २ लाख मुले या आजाराने पिडीत असलेली आढळतात. या आजारामध्ये साधारणतः मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण चार पटीने जास्त आढळते. एक सामाजिक प्रश्न

या आजारामध्ये मुले इतरांच्या भाव-भावना समजुन घेऊ शकत नाहीत. समाजातील इतरांशी नाते जोडू शकत नाहीत. असा आजार असणाऱ्या व्यक्तींच्या कुटुंबामध्ये साहजिकच विस्कळीतता निर्माण होते. हा आजार असणाऱ्या कुटुंबांची संख्या लाख-दोन लाख असेल तर ५ ते १० लाख माणसांच्या जिव्हाळयाचा नि घरगुती काळजीचा हा प्रश्न आहे. आपल्या मुलाला हा आजार आहे, समाजातील इतर मुलांसारखे आपले मूल वावरू शकत नाही हे आई-वडिलांसाठी फार धक्कादायक आहे. आपले मूल इतर मुलांपेक्षा काही वेगळे आहे, ही वस्तुस्थिती ते स्विकारू शकत नाहीत. त्यामुळे पालकांना समाजात वावरतांना उगीचच एक अपराधीपणाची भावना येते. कमीपणा वाटतो. यात आपलाच काही दोष आहे काय असे वाटू लागते. पण यात पालकांचा काही दोष नसतो. जन्मतःच मुलांच्या मेंदूमध्ये काही बिघाड होऊन हा आजार होतो. आता मज्जा विज्ञानातील प्रगतीमुळे या आजाराची कारणे निश्चितपणे कळू लागली आहेत. जनुकांत आणि मेंदूत या आजाराची कारणे सापडताहेत. पण यामुळे पालकांमध्ये घर उध्वस्त झाल्याची, किमान विस्कळीत झाल्याची भावना निर्माण होते हे मात्र खरे आहे. हा प्रश्न केवळ पालकांच्या भावनांचा नाही तर, बदलत्या, नव्याने निर्माण होणाऱ्या गरजांचा आहे. केवळ स्वमग्न मुलासाठीच्याच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाच्याच गरजांचे प्राधान्य बदलते, गरजा बदलतात, नव्या गरजा निर्माण होतात. त्यांच्या आजारामुळे त्यांच्यावरील उपचारांसाठी होणाऱ्या खर्चामुळे व्यावहारीक अडचणी निर्माण होतात. पालकांना समाजातील इतर मुलांकडे पाहिल्यावर आपल्या मुलामधील हा दोष प्रकर्षाने जाणवतो. व त्यांना त्याच्या भवितव्याची काळजी तर वाटतेच, पण रोजच्या रोज त्याला सांभाळावे कसे, शिकवावे कसे, अशा प्रश्नांची उत्तरे त्यांना शोधावी लागतात. अशा नवीन माहितीची, सोयींची त्यांना गरज भासू लागते.

सामान्य व्यक्तीच्या गरजा वेगळ्या असतात परंतु या व्यक्तींच्या गरजा या संपूर्णपणे वेगळ्या असतात. त्यांना वैद्यकिय उपचार वेगळे असतात. शिक्षण, समाजात वावरायचे कसे याचे ज्ञान या व इतर अनेक गोष्टींचे ज्ञान

त्यांना द्यावे लागते. व हे सारेच कुटुंबातील इतर व्यक्तींनी समजून घेणे आवश्यक असते. खरे तर "कुटुंब पातळीवर हाताळण्याचा असा हा एक सामाजिक प्रश्न आहे".

**आजाराचे स्वरूप**

Autism स्वमग्नता /आत्ममग्नता हा आजार ओळखण्याची दोन विशेष लक्षणे आहेत-

एक म्हणजे अशी मुले तेच तेच करतात, त्यांचे वर्तन पुनरूक्तीमय असते. दुसरे म्हणजे अशा व्यक्तींमध्ये सामाजिक संपर्काची अगदी खालची-निम्न पातळी असते, अशी मुले दृष्टीसंपर्क निर्माण करू शकत नाहीत, म्हणजे दुसऱ्या व्यक्तीच्या डोळयांकडे पाहून भावना ओळखु शकत नाहीत. दुसऱ्यांच्या भाव-भावनांना प्रतिसाद देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नसते.

स्वमग्नता (Autism) हा एक शारीरिक आजार आहे, मेंदूतील घटनांशी त्याचा संबंध आहे. असे आता संशोधनातून उमजून आले आहे. आपण आजवर या आजाराला 'स्वमग्नता' असे संबोधत आलो आहोत. पण मूल 'स्वमग्न' असते याचा अर्थ ते समाजापासून - समाजातील भाव-भावनांच्या विश्वापासून दूर असते. समाजसंपर्क निर्माण करण्याची क्षमताच ते सुरुवातीपासून हरवून बसलेले असते. म्हणून आपण या आजाराला 'समाजदूरता' असे ही संबोधू या. म्हणजे मग प्रश्नाची तीव्रता आपल्याला अधिक जाणवेल.

वैज्ञानिक युगामुळे मज्जाशास्त्रज्ञ, मज्जामानसशास्त्रज्ञ नवनवीन शोध घेताहेत. कोणताही आजार होण्यामागे कोणती कारणे आहेत तसेच ती दूर करण्यासाठीची उपाययोजना यावर संशोधन करणे चालू आहे. तसेच हा आजार होण्याची कारणे कोणती आहेत? यात मूल 'स्वमग्न का असते यापेक्षासुद्धा ते 'समाजदूर' का असते याचा शोध मज्जामानसशास्त्रज्ञ आणि मज्जाशास्त्रज्ञ घेताहेत, आणि त्यांना यात यश येतय् असे दिसते.

**भौतिक व मानवी जगाची ओळख**

लहान मुलांच्या ज्ञान ग्रहण करण्याच्या विकासातील दोन प्रमुख घटक असतात, आणि जन्मापासूनच या दोन दिशांनी त्यांचा प्रवास सुरू होतो. मुले चाला-बोलायला लागण्यापूर्वीच हा प्रवास सुरू झालेला असतो. मुले जगाची जी ओळख करून घेतात त्यात हे दोन्ही घटक येतात. एक आहे भौतिक वस्तूंचे जग आणि दुसरे असते अभौतिक असे मानवी मनांचे जग. मुलांच्यात निसर्गतःच द्वित्व (Duality) असते. दोन्ही घटकांशी जुळवून घेण्याची प्रक्रिया त्यांना सातत्याने करीत राहावी लागते.

यांपैकी भौतिक जगाची माहिती मुले आपल्या ज्ञानेंद्रियांमार्फत व कर्मेंद्रियांमार्फत करून घेतात. परंतु मानवी मनांचे जग मात्र मुलांना 'शिकावे लागते, 'समजावून घ्यावे लागते. मुले ज्या सांस्कृतिक वातावरणात वाढत

असतात, (आपण कोणत्या संस्कृतीत जन्माला येणार आहोत हे त्यांना माहीत नसते!) त्या संस्कृतीच्या संदर्भातच, मुले, मानवी मनाचे गुणधर्म समजावून घेतात. त्यासाठी त्यांना 'शिकण्या' च्या प्रक्रियेतून अपरिहार्यपणे जावे लागते. मुलांचे पहिल्या भाषेचे शिक्षण हे याचे उत्तम उदाहरण आहे. हे शिकणे सातत्याने होत असते.

इथे लक्षात घेण्यासारखी एक गोष्ट अशी आहे की, ज्याप्रमाणे भौतिक जग आकलनाची मूलभूत सोय निसर्गाने मानवी मेंदूमध्ये केलेली असते तशी ती मानवी मनांचे जग आकळून घेण्याचीही केलेली असते. म्हणजे असे की, मुलांना मानवी मनांचा आशय-शिकावा लागतो, म्हणजे, माणसे आनंदी कशाने होतात, दुःखी कशाने होतात, त्यांच्या श्रद्धा काय असतात, त्यांच्या इच्छा, आकांक्षा कोणत्या असतात, त्यांना केव्हा काय हवे, काय नको इत्यादी. परंतु अशा बाबी या माणसांच्या मनांशी संलग्न असतात, ही गोष्ट त्यांना निसर्गतःच अवगत होते. त्यासाठी दुसऱ्या माणसांच्या संपर्कात यावे लागते याचे ज्ञान त्यांना उपजतच असते.

स्वमग्न मुलांचा मूळ प्रश्न असा असतो की त्यांना भौतिक जग आकळून घेता आले तरी त्यांना मानवी मन आकळून घेता येत नाही. त्यामुळे हलत्या-बोलत्या माणसांकडे ती हलत्या-बोलत्या वस्तू म्हणूनच पाहतात. ती इतरांच्या मनांपर्यंत पोचू शकत नाहीत आणि इतरांना त्यांच्या मनांपर्यंत पोचता येत नाही. मना-मनांची तार इथे जुळतच नाही. स्वमग्न माणसांची मने अंध असतात. त्यांना आपण 'मनांध' (mindblind) म्हणून संबोधू शकतो.

सामान्य मुलांप्रमाणे आपल्यातील सामाजिकतेचा विकास करणे स्वमग्न मुलांना दुरापास्त असते. अगदी छोटी बाळे, समोर आलेले चेहरे निरखून पाहतात. नव्यानेच समोर येणारी वस्तू किंवा व्यक्ती यांच्याकडे टक लावून पाहतात. त्यांच्या त्या नजरेकरवी काहीतरी त्यांच्या मेंदूपर्यंत पोचते आहे, मनांपर्यंत पोचते आहे हे आपल्याला जाणवते, पण, स्वमग्न मुलांच्या बाबतीत असे वाटत नाही त्याची नजर निर्जीव वाटते, आणि तशी ती असतेही, कारण, ही मुले जन्मांध नसतात पण मनांध मात्र असतात.

हे असे का ? याचा मात्र थांगपत्ता आजवर लागला नव्हता. आता अलीकडच्या मेंदू संशोधनातील प्रगतीमुळे मेंदूमधील शारीर रचना आणि मूलभूत प्रक्रिया काहीशा हाती येऊ लागल्या आहेत. फोटो इमेजिंगच्या सहाय्याने मेंदूमधील विद्युत हालचाली, प्राणवायूचा वापर आणि रक्तप्रवाह यांबाबतची माहिती व त्यांचा आपल्या शारीरिक नि मानसिक वर्तनाशी असलेला संबंध उलगडू लागला आहे.

स्वमग्नतेच्या कारणांकडे नेणारी काही मेंदूविषयक संशोधने आपल्याला मार्गदर्शन करायला आज नव्याने उपलब्ध झाली आहेत. त्यांची काहीशी आज आपण करून घेऊ या. त्यामुळे स्वमग्न मुलांच्या प्रश्नांविषयीची आपली जाण खचितच वाढू शकेल.

**झोप व स्वमग्नता**

मेंदूमध्ये अक्षरशः अब्जावधी पेशी असतात. मेंदूचे कार्य, म्हणजेच माणसाचे जीवनकार्य व्यवस्थितपणे चालण्यासाठी या पेशींची परस्परांमध्ये जुळणी व्हावी लागते. मेंदूमध्ये अशीही व्यवस्था असते की ज्या पेशींचा, त्यांच्या परस्परजुळणींचा वापर होतो त्या कायम टिकून राहतात तर ज्यांचा वापरच होत नाही त्या झडून जातात. पेशींच्या निर्मितीचे कार्य जेवढे महत्त्वाचे असते तेवढेच हे नको असलेल्या पेशींच्या विनाशाचे कार्यही महत्त्वाचे असते. काही वेळेस नको असलेल्या पेशी नष्ट झाल्या नाहीत तर त्या इतर पेशींच्या कार्यात अडथळा होऊन बसतात आणि मग विशिष्ट संदर्भातील मेंदूच्या कामात अडथळा निर्माण होतो किंवा ते कामच थबकते. नेमकी हीच गोष्ट स्वमग्न माणसांच्या मेंदूत घडत असलेली, एका संशोधनांतून आढळून आली आहे.

१९९० च्या दशकातील ही गोष्ट आहे. जेफरी लेविन (Jeffery Levine) या संशोधकास एका स्वमग्न मुलाच्या मेंदूचा अभ्यास करताना अचानक असे आढळून आले की, त्याच्या झोपेतही त्याच्या मेंदूत काही, अपस्माराचे झटके बसावेत अशी विद्युत प्रक्रिया अनपेक्षितरित्या चालू आहे. विशेष म्हणजे ही हालचाल मेंदूमधील अशा भागात चालू होती की, जो भाग भाषा आत्मसात करण्याचा आणि सामाजिक संबंध प्रस्थापित करण्याचा कारक आहे. या घटनेमुळे चकित होऊन त्याने आणखी २२ स्वमग्न मुलांना आपल्या प्रयोगशाळेत आणले आणि त्यांच्या मेंदूची 'मेग' तंत्राद्वारे (MEG-Magnetoencephalography-या तंत्राद्वारे मेंदूतील अगदी सूक्ष्म हालचालींचा वेध घेता येतो.) पाहणी केली. तेव्हा २२ पैकी २१ मुलांमध्ये हीच बाब त्याला त्यांच्या झोपेमध्ये आढळून आली.

मेंदूचे कार्य सामान्यपणे नीट पद्धतीने चालायचे असेल तर अशी अडथळा निर्माण करणारी प्रक्रिया घडून येता कामा नये. परंतु स्वमग्न मुलांच्या बाबतीत, त्यांच्या मेंदूमध्ये, समाजसंपर्क विभागात या झोपेतील प्रक्रियेने अडथळे निर्माण होऊन त्यांचे वर्तन अल्पसे किंवा पूर्णतः विस्कळीत होत होते. ज्या पेशींचे काम असा अडथळा निर्माण करीत होते, त्या वास्तविक योग्य प्रकारे झडून जायला हव्या होत्या. परंतु या अपघाती आजार झटक्यांमुळे त्या पेशींचा वापर होत राहिला आणि मेंदूच्या नियमाप्रमाणे ज्या पेशी वापरल्या जातात त्या टिकून राहतात, तशा या पेशी टिकून राहिल्या. आणि मग त्या मेंदूचे विशिष्ट कार्यच बंद पाडू लागल्या. रस्त्यातील स्पीडब्रेकर्समुळे जसा गाडीचा वेग मंदावतो किंवा समोर मोठा अडथळा आला तर गाडीच बंद पडते, तसे काहीसे या बाबतीत होते.

या संशोधनांतून दोन निष्कर्ष पुढे आलेले आहेत. एक म्हणजे, स्वमग्नतेचा संबंध हा अपस्माराशी म्हणजे फेफरे येण्याच्या आजाराशी असला पाहिजे आणि दुसरे म्हणजे, माणसाच्या झोपेचा, म्हणजे झोपेत मेंदूमध्ये घडून येणाऱ्या हालचालींचा आणि शिकण्याच्या प्रक्रियेतील अडथळयांचा घनिष्ठ संबंध असतो. स्वमग्न मुलांच्या झोपेच्या तक्रारी त्यांचे पालक सांगू शकतील. ज्या मुलांना वाचनअटकाव (Dyslexia) आहे, त्यांच्याही बाबतीत, मेंदूमधील अशीच घटना कारणीभूत ठरते. प्रतिबिंब पेशी (Mirror Neurons)

अलीकडे, गेल्या आठ-दहा वर्षांतच केवळ 'प्रतिबिंब पेशींचा शोध लागला आहे. हा शोध इतका महत्त्वाचा आहे की त्याने माणसाचे भावनिक आयुष्यच नव्हे तर त्याचे साहित्यिक-वाङ्मयीन, नाट्य-नृत्य-सिनेमांच्या कलाकृतींचे आयुष्य-सारे सांस्कृतिक आयुष्य, लादीवर गालिचा अंथरावा तसे स्पष्टपणे डोळयांसमोर उभे राहतेय. त्यांची त्या सांस्कृतिक वृत्तींची-कृतींची नी त्यामुळे होणाऱ्या रसनिर्मितीची कारणमीमांसा आता, मेंदूपातळीवर घटनांच्या आधारे करता येऊ लागली आहे.

या प्रतिबिंब पेशींचे कार्य हे, दोन व्यक्तीमधल्या एकाच प्रकारच्या कृतींचा परस्पर संबंध निर्माण करण्याचे आहे. उदाहरणार्थ, नाटकातील उत्तम नट आपल्या भाव-भावनांशी समोरच्या प्रेक्षकांना एकरूप व्हायला लावतो, विनोदी पात्र आपल्याला खळखळून हसवते किंवा दुसऱ्याचे खरे वा नाटक-सिनेमातले दुःख पाहून आपल्या डोळयात पाणी उभे राहते, हे सारे घडते कारण त्या मूळ पात्राशी आपण एकरू प होतो. मेंदूतील घटनांच्या संदर्भात सांगायचे तर ज्या पेशी, विशिष्ट अभिनयांतून कलावंताच्या मेंदूत उद्दिपीत होतात नेमक्या त्याच पेशी, तशाच प्रकारे प्रेक्षकाच्या मेंदूतही उद्दिपीत होतात, जणू काही हा स्वतः प्रेक्षकच करीत आहेत, अनुभवीत आहेत. हा दोन व्यक्तींच्या कृतीमध्ये पूल बांधण्याचे कार्य मेंदूमधील प्रतिबिंब पेशी करीत असतात.

आपण ज्याला 'सहानुभूती 'सह-अनुभूती असा शब्दप्रयोग करतो, इंग्रजीत ज्याला Empathy असे म्हणतो, त्याच्या निर्मितीचे श्रेय हे या प्रतिबिंब पेशींचे असते. केवळ दुसऱ्याचे अवलोकन केल्याने या पेशी उद्दिपीत होतात, जागृत होतात. अर्थातच, माणसा-माणसांमधील संबंधांचा दुवा बांधण्याचे काम या प्रतिबिंब पेशी करीत असतात, हे नीटपणे लक्षात घेतले तर स्वमग्न मुले असा दुसऱ्यांशी संबंधांचा दुवा का बांधू शकत नाहीत याचे कारण कळते. अशा मुलांच्या मेंदूमध्ये प्रतिबिंब पेशी निर्मितीचे काम पुरेसे होत नाही, किंवा प्रतिबिंब पेशींचे उत्पादनच होत नाही. साहजिकच अशी मुले सह-अनुभूती घेऊ शकत नाहीत, सामान्य माणसे अगदी केवळ नजरेनेही जो संपर्क साधतात तो या व्यक्तींना साधता येत नाही. त्यांच्या दुसऱ्यांच्या भावना जाणण्याची ही क्षमता नसते. मेंदूविकासातील ती अक्षमता असते.- (It is a developmental disability.)

**स्वमग्नतेचे वैयक्तिक परिणाम**

कारणांकडून आपण परिणामाकडे वळू या. स्वमग्नतेचा आजार असणात्या मुलांना दुसऱ्यांना मन असते याचेच आकलन नसते. त्यांच्या मनाला तिथपर्यंत पोचताच येत नाही. त्यामुळे समाजसंपर्काने ज्यांचा विकास होतो अशा अनेक मानवी क्षमता या मुलांच्या बाबतीत कमजोर राहण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, भाषाविकास, भावनिक विकास, बुद्धीविकास, सामाजिक विकास अशा सर्व बाबतींत, कमी-अधिक प्रमाणात परिणाम होत असतो. स्वमग्नतेचा आजार जेवढा तीव्र तेवढी या घटकांवरील उणे परिणामाचे प्रमाण जास्त

आढळून येते. हा आजार रुग्णाच्या अनेक क्षमतांवर एकाचवेळी परिणाम करीत असल्यामुळे त्याला संकलित विकासात्मक विकृती ('pervasive developmental disorder') असे मानले जाते.

मला असे वाटते की, माणूस म्हणून जन्माला येणे ही गोष्ट वेगळी आणि माणूस म्हणून जगता येणे ही गोष्ट वेगळी. माणूस म्हणून जन्माला येणे ही केवळ निसर्गदत्त बाब आहे, पण माणूस म्हणून जगायला मिळणे ही निखळपणे सामाजिक गोष्ट आहे. त्यामुळेच, ज्या मुलांना, ज्या व्यक्तींना असे माणूस म्हणून आपले सामाजिक आयुष्य जगण्याचे भाग्य लाभलेले नाही, त्यांचे अस्तित्व, त्यांचा विकास, त्यांचे जगणे अर्थपूर्ण कसे करावे, ही एक अनेक व्यक्तींच्या नि कुटुंबांच्या दैनंदिन जीवनाशी भिडलेली सामाजिक समस्या आहे. आणि प्रत्येकच सामाजिक समस्या ही समाजात अर्थपूर्णतेने जगण्याचे भाग्य लाभलेल्या तुमच्या-माझ्यासारख्या लोकांनी, आपला हातभार लावून सोडविण्याची आवश्यकता असते. ती केवळ आपलीच जबाबदारी असते.

❖